MHST010006972019

## सत्र खटला क्र.३१/२०१९

महाराष्ट्र शासन ...... फिर्यादी
विरुध्द
श्री.कैलास शंकर पिटेकर. ...... आरोपी

### (अर्ज निशाणी क्र.२८ खालील आदेश)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार श्री.शिवाजी काशिनाथ जाधव (विधी संघर्षीत बालकाचे वडील) यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ प्रमाणे त्यांच्या मालकीची बजाज एक्ससीडी१२५ मोटार सायकल क्र.एम.एच.११ए.एन.३६७८ चा कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. सदरचा मुद्देमाल शाहूपुरी पोलीस ठाणे गु.र.क्र.३२२/२०१८ चे कामी जप्त केलेला आहे.

०२. सदरकामी सरकारी वकील यांनी निशाणी २९ लगत म्हणणे दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचे वाहन हे अर्जदाराच्या मुलाने गंभीर गुन्ह्याकामी वापरले असून सदर वाहनाचा वापर पुन्हा अशा प्रकारच्या गुन्ह्यात होण्याची शक्यता आहे. सबब, अर्जदाराचा अर्ज नामंजुर करणेत यावा.

०३. वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्रावरुन अर्जदार प्रस्तुत वाहनाचे मालक असल्याचे दिसून येते. अर्जदाराच्या कथनानुसार त्यांना दैनंदिन वापरासाठी सदर वाहनाची आवश्यकता आहे. सदरचे वाहन पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अर्जदाराचे आर्थीक नुकसान होऊ शकते. सबब, अर्जदारास सदरचे वाहन काही अटी व शर्तींवर सुपुर्दनाम्यावर परत मिळणे न्यायोचित वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश.

### आदेश

०१. मुद्देमाल बजाज एक्ससीडी१२५ मोटार सायकल क्र.एम.एच.११ए.एन.३६७८ अर्जदारास खालील अटी व शर्तींवर सुपूर्दनाम्यावर परत देण्यात यावी.

अ. अर्जदाराने रक्कम रुपये १,००,०००/– (रुपये एक लाख फक्त) चा सुपूर्दनामा लिहून द्यावा.

ब. अर्जदाराने सदर वाहनाची विक्री कोणासही करु नये अथवा त्यामध्ये कोणत्याही त्रयस्थ इसमाचा कोणत्याही प्रकारचा हक्क अधिकार प्रस्थापित करुन देवू नये.

क. अर्जदाराच्या ताब्यात वाहन देतेवेळी वाहनाच्या परिस्थितीविषयी वर्णन संबंधीत पोलीस ठाणे यांनी लिहून ठेवावे. तसेच वाहनाचे फोटो काढावेत व ती दोन्ही कागदपत्रे प्रस्तुत प्रकरणाच्या अभिलेखाकरीता या न्यायालयात सादर करावीत.

ड. अर्जदाराने वाहनाच्या दृश्य स्वरुपात कोणत्याही प्रकारचे बदल करु नयेत.

इ. अर्जदाराने न्यायालय ज्यावेळेला आदेश देईल त्यावेळेस प्रस्तुत प्रकरणाच्या चौकशीचे कामी वाहन न्यायालयात हजर करावे.

VINAYAK RAJARAM JOSHI

Digitally signed by VINAYAK RAJARAM JOSHI
Date: 2024.12.04 12:57:30 +0530

(वि.रा.जोशी)

दिनांकः ०४.१२.२०२४ सत्र न्यायाधीश, सातारा.

---